प्रकरण चौथे

# संकलित माहितीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष

# प्रकरण चौथे
# संकलित माहितीचे विश्लेषण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष

- प्रस्तावना
- संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- निष्कर्ष

# प्रकरण चौथे
# संकलित माहितीची नोंद, विश्लेषण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष

**प्रस्तावना :**

या पूर्वीच्या तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधिकेने संशोधनाच्या कार्यपध्दतीचे वर्णन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व अर्थनिर्वचन केले आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये गोळा केलेली माहिती गुणात्मक व संख्यात्मक अशा दोन्ही प्रकरची होती. त्यामुळे गुणात्मक व संख्यात्मक या दोन्ही प्रकारने विश्लेषण केले आहे.

**उद्दिष्टानुरुप संशोधन सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

**उद्दिष्ट क्र.१** साठी केलेले विश्लेषण

उद्दिष्ट क्र. १ - ''इ. ८ वी च्या अभ्यासक्रमाचे पर्यावरण दृष्टीकोनातुन विश्लेषण करणे''.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसर प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाचे पुनर्रचना करण्याचा महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला व या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने इयत्ता पहिली ते पाचवीचा पुनर्रचीत अभ्यासक्रम प्रकाशित करुन त्याच्या अंमलबजावणीस जुन १९८९ पासुन सुरुवात केली. शाासनाने शासन निर्णय क्रमांक पीटीसी/१०८७/३५५८७/माशि-५, दिनांक ५ मे १९८९ अन्वये नवीन अभ्यासक्रमास मान्यता दिली.

नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीचा दुसरा टप्पा म्हणुन इयत्ता ६ वी ते ८ वी च्या उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना परिषदेने केली. उच्च प्राथमिक स्तरावर शालेय अीयासक्रमात काही नवीन विषयाच्या अध्यापनास सुरुवात होते. प्राथमिक व उच्च प्राथमिक अभ्यासक्रमाचा सांधा जुळवुन विध्यार्थांना सलगपणे अभ्यासक्रमामधील विषयांचे अध्यापन पुर्वनियोजनाने करण्यासाठी व या अभ्यासक्रमामधुन २१ व्या शतकामधील